Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 02/07/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटण्या, आतल्या वाटण्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष

### श्रेष्ठ गायक नट गणपतराव बोडस



गणपतराव बोडस हे मराठी रंगभूमीवरील एक श्रेष्ठ गायक नट होते. त्यांचा जन्म २ जुलै १८८० साली अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव येथे झाला. त्यांचे संपूर्ण नाव गणेश गोविंद बोडस, पण गणपतराव याच नावाने ते ओळखले जात. शाळेत शिकत असताना ते हौशी नाट्यमंडळातून कामे करू लागले. १८९५ साली त्यांनी 'किर्लोस्कर संगीत मंडळी'त प्रवेश केला. तेथे त्यांना पहिली काही वर्षे दुय्यम भूमिका विशेषत: स्त्रीभूमिका मिळाल्या, पण हळूहळू त्यांना सौभद्र नाटकात कृष्ण, शारदा नाटकात कांचनभट, मूकनायकात विक्रांत व मानापमानात लक्ष्मीधर अशा महत्त्वाच्या भूमिका मिळत गेल्या. त्यांनी १९१३ साली किर्लोस्कर मंडळी सोडून बालगंधर्व व गोविंद सदाशिव टेंबे यांच्या सहकार्याने 'गंधर्व नाटक मंडळी'ची स्थापना केली. या कंपनीने सौभद्र, मृच्छकटिक, मानापमान, विद्याहरण इ. नाटकांव्यतिरिक्त संशयकल्लोळ, स्वयंवर, एकच प्याला, द्रौपदी इ. दर्जेदार नाटकेही रंगभूमीवर आणली.

सुधाकर (एकच प्याला), लक्ष्मीधर (मानापमान), शकार (मृच्छकटिक), शिष्यवर (विद्याहरण) आणि फाल्गुनराव (संशयकल्लोळ) या गणपतरावांच्या भूमिका विशेष गाजल्या. १९३० सालानंतर मराठी रंगभूमीस उतरती कळा लागली व त्यानंतर अल्पावधीतच गणपतराव नाट्यव्यवसायातून निवृत्त झाले. पुढे त्यांनी एकदोन चित्रपटात भूमिका केल्या, परंतु चित्रपटसृष्टीत त्यांचे मन रमले नाही. नंतरच्या काळात त्यांनी प्रामुख्याने होतकरू नटांना मार्गदर्शन करण्याचेच काम केले. गणपतरावांना १९४० साली नाशिक येथे भरलेल्या एकतिसाव्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला होता. पुढे १९५६ साली नांदेड येथे भरलेल्या मराठवाडा नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. त्याच वर्षी त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्ली येथे संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार देण्यात आला. गणपतरावांनी चाळीस वर्षे मराठी रंगभूमी गाजविली व नाट्यसृष्टीतील अनेक बहुमान प्राप्त केले. अशा या मराठी रंगभूमीवरील श्रेष्ठ नटाचे २३ डिसेंबर १९६५ साली पुणे येथे निधन झाले.

Nashik Edition
Jul 02, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401